# डी के ए.एस.सी. महाविद्यालयाचा शासकीय ‘हर घर तिरंगा’ रॅलीत उत्स्फूर्त सहभाग...

इचल : इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने आयोजित ‘हर घर तिरंगा’ या शासकीय उपक्रमांतर्गत भव्य तिरंगा रॅली उत्साहात संपन्न झाली. या रॅलीमध्ये दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजीच्या एन सी सी विभागाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर रॅली शाहू पुतळा येथून प्रारंभ होऊन शिवतीर्थ, शंभूतीर्थ मार्गे गांधी पुतळा येथे संपन्न झाली.

या रॅलीसाठी खासदार धैर्यशील माने, आमदार राहुल आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर, महापौर उदय धातुंडे, आयुक्त पल्लवी पाटील तसेच विविध शासकीय अधिकारी, महानगरपालिका क्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के.खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली एन सी सी विभाग प्रमुख लेफ्ट. विनायक भोई यांनी रॅलीमध्ये सहभाग नोंदवत तिच्या यशस्वी नियोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुचय खोपडे, प्रा. रोहित शिंगे व प्रा. प्रथमेश गवळी उपस्थित होते.




Girls Parking
SECURITY
GPS Map Camera
Ichalkaranji, Maharashtra, India
Mfr2+rhc, Kolhapur Road, Tambe Mala, Ichalkaranji,
Maharashtra 416115, India
Lat 16.6921° Long 74.451419°
Monday, 17/08/2026 09:55 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Ichalkaranji, Maharashtra, India
Gat No-310, W No 10, Kolhapur Road, Opp. New,
Kagwade Mala, Ichalkaranji, Maharashtra 416115, India
Lat 16.691388° Long 74.453796°
Monday, 17/08/2026 10:19 AM GMT +05:30
Google